लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM
नागपूर, शुक्रवार, १० फेब्रुवारी २०२३

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर

## पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीची सुचना

क्षेत्रीय केंद्र अधिकारी (पर्यावरण), वे.को.लि. बल्लारपूर क्षेत्र, ता. राजूरा, जि. चंद्रपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित विस्तारीकरणा करिता मे. वे.को.लि. सास्ती खुली खाण, सास्ती, ता. राजूरा, जि. चंद्रपूर येथे वाढीव प्रकल्प क्षेत्र - 919.69 हेक्टर ते 1120.48 हेक्टर क्षेत्रात 2.50 दश लक्ष टन प्रति वर्ष उत्पादन क्षमतेच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याकरिता म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज सादर केला आहे. सदर प्रकल्पामुळे राजूरा तालुक्यातील गौरी, पौनी, सास्ती, अंतरगांव, माथरा, गोयेगांव व धोपताळा ही गावे प्रभावित होणार आहेत. सदरील प्रस्तावित प्रकल्पाकरिता भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. 14 सप्टेंबर, 2006 च्या अधिनियमान्वये व दि. 01 डिसेंबर, 2009 च्या सुधारित अधिनियमान्वये उपरोक्त प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करण्यात येत आहे.

सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक मुद्यांबाबत घेण्यात येत असून सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पासंबंधी टिका-टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदविता येईल.

सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत 30 दिवसांच्या आत खालील पत्त्यावर नोंदविण्यात याव्यात.

**प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालय**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**
**उद्योग भवन, पहिला माळा, बस स्टॅण्ड समोर, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर**
**फोन नं.: 07172-251965**
**ईमेल:- rochandrapur@mpcb.gov.in / srochandrapur@mpcb.gov.in**

मौखिक किंवा लेखी आक्षेप जाहिर जनसुनावणीच्या वेळेस सुध्दा नोंदविता येईल. जाहिर जनसुनावणी खालील ठिकाणी घेण्यात येईल:

**दिनांक** : **16/03/2023**
**वेळ** : **दुपारी 01:00 वाजता**
**स्थळ** : **मनोरंजन केंद्र, वे.को.लि.सास्ती वसाहत, धोपताळा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.**

सदर प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक माहिती असलेले दस्तावेज खालील कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये सदर दस्तावेज अभ्यासु शकतील.

1. पर्यावरण विभाग, 15 वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - 400 032
2. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, 2 रा व 4 था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - 400 022
3. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
4. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
5. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
6. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
7. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
8. उप-विभागीय कार्यालय, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
9. नगर परिषद, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
10. तहसिल कार्यालय, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
11. पंचायत समिती कार्यालय, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
12. ग्राम पंचायत कार्यालय, गौरी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
13. ग्राम पंचायत कार्यालय, सास्ती, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
14. ग्राम पंचायत कार्यालय, पौनी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
15. ग्राम पंचायत कार्यालय, अंतरगांव, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
16. ग्राम पंचायत कार्यालय, गोयेगांव, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
17. ग्राम पंचायत कार्यालय, माथरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
18. ग्राम पंचायत कार्यालय, धोपताळा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.

**स्वा/-**
**उप-प्रादेशिकअधिकारी**
**म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक**
**पर्यावरण विषयक जनसुनावणी.**